




दैनिक

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २१३ ●रविवार, दि.०२ नोव्हेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955


# लोकशाही टिकवायची असेल तर मतभेद विसरून एकत्र या : शरद पवार

**मुंबई । प्रतिनिधी**

मतदारयाद्यांमधील घोळ आणि कथित मतचोरीविरोधात महाविकास आघाडीचा मुंबईत मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चात मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे, तसंच महाविकास आघाडीचे उद्धव ठाकरे, शरद पवार, जयंत पाटील, बाळासाहेब थोरात यांच्यासह प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. सत्याचा मोर्चा असं या मोर्चाचं नामकरण करण्यात आलंय. आयोगाचा बेजबाबदार कारभार, मतचोरी, मतांमधील घोळ, निवडणुकीतील गैरव्यवहार याबाबत हा मोर्चा काढण्यात आला. लोकांना सत्य कळावं आणि असत्य जनतेसमोर यावं या मोर्चाचं आयोजन करण्यात आलं होते.



### • ॲनाकोंडाला कोंडावंच लागेल नाहीतर हे लोक सुधारणार नाहीत– उद्धव ठाकरे

ॲनाकोंडाला आपल्याला आता कोंडावंच लागेल. नाहीतर हे लोक सुधारणार नाहीत. रोज कुठून तरी पुरावे येत आहेत. तरीही राज्यकर्ते आणि निवडणूक आयोग गप्प बसले. आपला पक्ष चोरला, नाव चोरलं, निशाणी चोरली माझे वडील चोरी करायचा प्रयत्न झाला आणि ते पण पुरलं नाही म्हणून आता मतचोरी करत आहेत. मुख्यमंत्री म्हणाले की विरोधी पक्षांनी म्हणजे आपण कसा लाभ घेतला याचा पर्दाफाश करेन. मी देवेंद्र फडणवीस यांना आव्हान देतो आहे की तुम्ही आमचा पर्दाफाश कराच. मुख्यमंत्री जेव्हा असं बोलत आहेत त्याचा अर्थ त्यांनी मतचोरी मान्य केली आहे. असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

### • आजचा मोर्चा राग आणि ताकद दाखवण्याचा मोर्चा– राज ठाकरे

आजचा मोर्चा राग दाखवण्याचा, ताकद दाखवण्याचा, दिल्लीपर्यंत आवाज पोहचवण्याचा मोर्चा आहे. आत्तापर्यंत या विषयावर सगळे जण बोलले आहेत. मी पण माझी भूमिका मांडली आहे. या विषयावर आता नव्याने बोलण्यासारखं काही नाही. तुम्ही सगळेजण अत्यंत ताकदीने मोर्चासाठी जमलात त्याबद्दल मी तुमचे आभार मानतो असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे. दुबार मतदार आहेत हे आम्ही सांगतो आहे, उद्धव ठाकरे, शरद पवार, जयंत पाटील हे सगळे सांगत आहेत. भाजपाचे लोक सांगत आहेत, अजित पवारांचे लोक सांगत आहेत एकनाथ शिंदेंचे लोक सांगत आहेत की दुबार मतदार आहेत. मग निवडणूक घेण्याची घाई का? असा प्रश्न राज ठाकरेंनी उपस्थित केला आहे.

## 'महिला डॉक्टरचे दोघांशीही संबंध, चॅट समोर आले ते...' मंत्र्यांच्या आरोपानं खळबळ

**मृत महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणावरून महाराष्ट्राचं राजकारण चांगलंच ढवळून निघालं आहे**

**मुंबई । प्रतिनिधी**

साताऱ्यातील मृत महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणावरून महाराष्ट्राचं राजकारण चांगलंच ढवळून निघालं आहे. या संवेदनशील प्रकरणात राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या विधानावरून आधीच वाद पेटलेला असताना, आता त्याच मार्गाने जात मंत्री



जयकुमार गोरे यांनी केलेल्या विधानामुळे नवा गदारोळ होण्याची शक्यता आहे. या सत्ताधारी नेत्यांच्या भूमिकेमुळे 'मृत डॉक्टर महिलेचं चारित्र्यहनन सुरू आहे का?' असा थेट सवाल आता विरोधकांनी उपस्थित केला आहे.

महिला डॉक्टरच्या आत्महत्येमागे 'त्रिकोणी संबंध' असल्याचा ▶▶ उर्वरित पान २

## गाडी गहाण ठेवून पाच लाख घेतले ; रात्रीतून गाडी ही केली लंपास

### • मित्राने साथीदाराच्या मदतीने केली फसवणूक

**केज । प्रतिनिधी**

एका व्यापाऱ्यास लहानपणीच्या मित्राने त्याच्या मित्राला पैशाची गरज असल्याचे सांगून थार गाडी गहाण ठेवून त्याबदल्यात पाच लाख रुपये घेतले. काही तासात व्यापाऱ्याच्या ताब्यातील गाडी घेऊन लंपास करीत फसवणूक केल्याचा प्रकार जिरेवाडी (ता. परळी)



येथील एका व्यापाऱ्यासोबत घडला. गाडीचा करारनामा, नोटरी व पैशाचा व्यवहार केज शहरात घडल्याने याप्रकरणी पाच जणांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

जिरेवाडी येथील व्यापारी राहुल रामहरी कांदे यांना ३० जुलै रोजी दुपारी एक ते दीड वाजेच्या दरम्यान त्यांचा लहानपणीचा मित्र संजय गुलाब पवार (रा. नाथ टॉकीजचे पाठीमागे शिवाजीनगर, परळी) याने फोन करून त्याच्या मित्राला पैशाची गरज असून त्याची थार गाडी गहाण ठेवण्यास तो तयार असल्याचे सांगितले. त्यानंतर गाडीचे फोटो, आरसी बुक पाठविले. त्या गाडीचा क्र. ▶▶ उर्वरित पान २ वर

## श्रीकाकुलममधील वेंकटेश्वर स्वामी मंदिरात चेंगराचेंगरीत ९ भाविकांचा अंत



**वृत्तसंस्था**

आंध्र प्रदेशातील श्रीकाकुलम जिल्ह्यात काशी बुग्गा वेंकटेश्वर स्वामी मंदिरात झालेल्या भीषण चेंगराचेंगरीत नऊ भाविकांचा मृत्यू झाला आणि अनेक जण जखमी झाले. काही जखमींची प्रकृती गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती आहे. कार्तिक महिन्यात एकादशीच्या शुभ मुहूर्तावर ही घटना घडली, जेव्हा मंदिरात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी जमली होती. मंदिर संकुलाच्या प्रवेशद्वाराजवळ अचानक गर्दी वाढली, ज्यामुळे घबराट निर्माण झाली आणि चेंगराचेंगरी झाली. गर्दीने अनेक लोक खाली पडले आणि चिरडले. माहिती मिळताच प्रशासनाने मदत आणि बचाव कार्य ▶▶ उर्वरित पान २ वर

## शेत रस्त्यांसाठी राज्य सरकारकडून नवीन नियमावली जाहीर, कोणते फायदे मिळणार?

**नागपूर । प्रतिनिधी**

राज्यातील शेतरस्ते आणि वहिवाटीच्या रस्त्यांवरील दीर्घकाळ प्रलंबित वादांवर आता कायमस्वरूपी तोडगा निघणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे राज्यभरातील हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. महसूल विभागाने




या संदर्भात अधिकृत परिपत्रक जारी केले असून, तहसीलदारांनी दिलेल्या आदेशांची सात दिवसांत अंमलबजावणी करणे आता सक्तीचे ठरणार आहे. तसेच प्रत्येक प्रकरणात स्थळ पाहणी, पंचनामा आणि जिओ-टॅग केलेली छायाचित्रे सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

## राज्यस्तर शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेचे थाटात उद्घाटन

**बीड । प्रतिनिधी**

शालेय शिक्षण व क्रीडा विभागा अंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अंतर्गत अधिनस्त जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड यांचे विद्यमाने व जिल्हा राज्य व्हॉलीबॉल संघटनेच्या तांत्रिक सहकार्याने दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, इनडोअर हॉल, बीड येथे विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र राज्य, मा.श्री. विक्रम काळे, बीड विधानसभा सदस्य मा. श्री. संदिप क्षीरसागर, जिल्हाधिकारी मा. श्री. विवेक जॉन्सन, पोलीस अधीक्षक मा. श्री. नवनीत कॉवत, छत्रपती संभाजीनगर विभागाचे क्रीडा उपसंचालक मा. श्री. शेखर पाटील, ▶▶ उर्वरित पान २ वर

## मैदान मारणारं पोरगं गजाआड, लेकासाठी बापाचं काळीज तुटलं; डोळ्यात पाणी आणून सरकारला आर्त विनवणी




**सोलापूर । प्रतिनिधी**

राज्यातील प्रसिध्द कुस्तीपटू महाराष्ट्र केसरी विजेता सिकंदर शेख यावर पंजाब पोलिसांनी कारवाई केली आहे. अवैध शस्त्रांची तस्करी केल्याप्रकरणी व राजस्थानमधील पिपला गुर्जर गँगसोबत सिकंदरचे संबंध आहेत, या संशयाखाली सिकंदर शेखला पंजाब राज्यात पोलिसांनी अटक केली आहे. मूळचा ▶▶ उर्वरित पान २ वर

## पुढील आठवड्यात नगरपालिका निवडणुकीची घोषणा होणार, २१ दिवसात प्रक्रिया पार पडणार

**मुंबई । प्रतिनिधी**

पुढील आठवड्यात नगरपालिका निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पहिल्या टप्प्यात



राज्यातील २४६ नगरपालिका, ४२ नगरपंचायतीची निवडणूक पार पडणार आहे. २१ दिवसात निवडणूक प्रक्रिया पार पडताना तात्काळ दुसऱ्या टप्प्यात जिल्हा परिषद ▶▶ उर्वरित पान २ वर






## १३ कोटी खर्चून बांधलेल्या नवीन बसस्थानकाला उद्घाटनाआधीच गळती

**बीड । प्रतिनिधी**

तब्बल १३ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेले बीडचे नवीन बसस्थानक उद्घाटनाआधीच गळतीला लागले असून, प्रवाशांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. दोन दिवसांपूर्वी झालेल्या पावसात स्थानकाच्या छपरातून अनेक ठिकाणी पाणी गळत होते, त्यामुळे प्रवाशांना छत्री घेऊन बसस्थानकात उभे राहावे लागले.

जून २०२५ मध्ये हे काम पूर्ण होणे अपेक्षित होते, मात्र अद्याप अनेक कामे अपूर्ण असून




प्रवाशांना सतत गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. परिसरात स्वच्छतेचा पूर्ण अभाव आहे; शौचालय बांधले असले तरी ते पत्रे लावून बंद ठेवण्यात आले आहेत. तसेच बसस्थानक परिसरात पथदिवे बंद असुन योग्य प्रकाश व्यवस्था नसल्याने रात्री अनुचित घटना घडल्याचेप्रकार आढळून आले आहेत. गुत्तेदाराने निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्यामुळे बसस्थानकाचे छप्पर आणि पत्रे उघड्यावर आले आहेत. संबंधित विभागीय नियंत्रक व अभियंत्यांनी याकडे ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● दोन वेळा भूमि पूजन करून श्रेय घेणारे नेते आता गप्प

**बीडच्या मध्यवर्ती बसस्थानकासाठी निधी आणल्याचे सांगत दोन वेळा भूमिपूजन करून पत्रकबाजी करणारे नेतेमंडळी, आता या निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत मूक-बधिर बनले आहेत, अशी संतप्त प्रतिक्रिया डॉ. गणेश ढवळे यांनी दिली आहे.**

## सत्ताधाऱ्यांना तब्बल ९८% मतं; निवडणुकीत घोळ झाल्याचे आरोप; देश पेटला, गोळीबारात ७०० जणांचा मृत्यू



**वृत्तसंस्था**

टांझानियात राष्ट्रपती सामिया सुलुहू हसन यांनी ९८% मतं मिळवत विजय मिळवला, पण निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर गडबड झाल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. निकालांनंतर देशात हिंसाचार उफाळला असून, ७०० जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. संयुक्त राष्ट्रांनीही या हिंसाचारावर चिंता व्यक्त केली आहे.

डोडोमा: टांझानियात एका बाजूला विजयोत्सव सुरु असताना दुसऱ्या बाजूला आक्रोश पाहायला मिळत आहे. एका बाजूला विजयाचे फटाके फुटत असताना दुसऱ्या बाजूला गोळीबाराचे आवाज ऐकू येत आहेत. राष्ट्रपती सामिया सुलुहू हसन यांनी सार्वत्रिक निवडणुकीत ९८ टक्के मतं मिळवत विजय साकारला. निवडणूक आयोगानं दिलेल्या माहितीनुसार, या आठवड्यात झालेल्या ३.२ कोटी मतदानांपैकी जवळपास सगळीच मतं हसन यांच्या बाजूनं पडली. त्यामुळे हसन आणखी एक कार्यकाळ मिळालेला आहे. हसन यांचा विजय इतका मोठा त्यावरुन वाद निर्माण झाला आहे. संपूर्ण निवडणूक वादग्रस्त ठरली आहे. देशात हिंसाचार उफाळला आहे.

निवडणुकीचे निकाल येताच देशाच्या अनेक भागांमध्ये

▶▶ उर्वरित पान २ वर



# प्रकाश दादा तुमचे अभिनंदन! तुम्ही खरं बोललात पण अर्धसत्यच!!

**माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी निवडून येण्यासाठी 'चपटी, कोंबडं, बकरं, लक्ष्मीदर्शन' करावं लागतं, याच मार्गाने मी निवडून आलो असल्याचे वक्तव्य केलं. भारतीय लोकशाहीच्या पाऊन शतकी वाटचालीचं हे ऊघड गुपित आहे. प्रकाश दादांनी या वक्तव्या वरून पलटी मारून आपण कार्यकर्त्यांना हसवण्यासाठी विनोद केला असल्याचे म्हटले असले तरी ते भयाण वास्तव आहे. या लोकांनी स्वातंत्र्यासाठी आपले सर्वस्व अर्पण केलेल्या पूर्वसूरींचा अपमान केला तर आहेच परंतु लोकशाहीचा विनोद केला आहे! दादा खरं बोलले पण अर्धसत्यच, त्यापुढेही अनेक बाबी आहेत. ही अंधाराच्या आणि गुलामीच्या दिशेने वाटचाल आहे. लोकशाहीवादी आणि मानवतावादी परिवर्तनवादी लोकांनी गट तट वैचारिक मतभेद संपवून लोकशाही वाचवली पाहिजे...**

माजलगावचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी निवडून येण्यासाठी चपटी, कोंबडं, बकरं, लक्ष्मीदर्शन करावं लागतं! निवडणुकीच्या आगोदरचे दोन दिवस यासाठी महत्वाचे असतात! स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी ईच्छुक कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी ही कबुली दिली. प्रकाश दादाच्या कबुलीजबाबाने भारतीय लोकशाहीच्या भयाण वास्तवाच्या उघड गुपिताची प्रथमच जाहीर कबुली देण्यात आली! प्रकाश दादांनी कार्यकर्त्यांना जो उपदेश केला आणि आपण स्वतः या तंत्राचा वापर करून अनेकदा कसे आमदार झालो हे जाहीरपणे सांगितले. ती या देशातील लोकशाहीची आजची स्थिती आहे. काही सन्माननीय अपवाद वगळता आपले बहुतांश आमदार, खासदारच काय अगदी सरपंच- ग्रामपंचायत सदस्य याच प्रकारे निवडुन येतात, हे जगजाहीर आहे. प्रकाश दादा जाहीर बोलले, बाकीचे जाहीर बोलत नाहीत, एवढाच काय तो फरक! मात्र खाजगीत निवडणुकीसाठी किती खर्च झाला याची चर्चा या लोकसेवकांकडून केली जाते! निवडणुका जिंकण्यासाठी चपटी, कोंबडं, बकरं आणि लक्ष्मीचा वापर करावा लागत असल्याची कबुली माजलगावचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी दिली त्याबद्दल त्यांचे जेवढे अभिनंदन आणि कौतुक करावे तेवढे थोडेच!! पण प्रकाश दादाही अर्धसत्यच बोलले! निवडून येण्यासाठी वापरल्या जाणा-या यापुढच्या अनेक बाबींवर त्यांनीही 'प्रकाश' टाकला नाही! मागील अनेक निवडणुकांत समाजसेवेची प्रचंड उर्मी असलेले उमेदवारांकडून प्रचंड दहशत निर्माण केली जाते. मतदान केंद्रावर दहशत माजवून मतदान केंद्र ताब्यात घेणे, मतदारांच्या बोटाला केवळ शाई लावून एकाच माणसान बटन दाबणे! विरोधी मतदारांचे आणि आपल्याही मतदारांचे मत आपणच करणे,...असे अनेक 'फंडे' आपले 'समाजसेवक' वापरतात!

मागील लोकसभा, त्यापूर्वी मध्यप्रदेश, गुजरात विधानसभा आणि नंतरच्या हरियाणा, महाराष्ट्र, दिल्ली विधानसभा निवडणुकीचे निकाल सामान्य माणूस आणि भल्या भल्या राजकीय विश्लेषकांची मती गुंग होणारे, जनभावने विपरीत आले, तेंव्हाच यात काहीतरी काळेबेरे असल्याची शंका लोकशाहीवादी कार्यकर्त्यांना येत होती! खरं म्हणजे देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त निवडीसाठी देशाचे पंतप्रधान, सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि लोकसभेतील विरोधी पक्ष नेता असे पॅनल होते.या निवड प्रक्रियेत लोकशाहीच्या वेगवेगळ्या खांबाचे प्रमुख असल्याने, योग्य व्यक्तिचे ते निवड करतील अशी अपेक्षा होती आणि या पॅनलने टी. एन. शेषन सारख्या खमक्या निवडणूक आयुक्तांची निवड केली होती. परंतु विद्यमान मोदी सरकारने मुख्य निवडणूक आयुक्त निवड प्रक्रियेतून सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीशांना हटवले. तिथेच शंकेची पाल चुकचुकली. आता भयंकर काहीतरी होणार, अशी शंका निर्माण झाली आणि पुढे ती खरी ठरली. यानंतर मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून आलेले राजीव कुमार आणि विद्यमान मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी ज्या पद्धतीने निवडणूका घेतल्या त्यावरून सामान्य माणसाचा निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास ऊडून जाईल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. कोणत्याही निवडणूकीचे मतदान संपन्न होताच मतदानाची आकडेवारी प्रसिद्ध केली जाते, दुसऱ्या दिवशी मतदानाची अंतीम टक्केवारी जाहीर केली जात असे. त्यात एकअर्धा टक्क्याचा फरक पडत असे! परंतु राजीव कुमार यांच्या काळात मतदान संपल्यानंतर आठ आठ दिवसांनी अंतीम टक्केवारी जाहीर केली गेली आणि त्यामधे सात आठ टक्के इतकी वाढ झाली! ती निश्चित संशयास्पद होती! कर्नाटकातील बेंगळुरू लोकसभा मतदारसंघातील महादेवपुरा विधानसभा मतदारसंघातील बोगस मतदार नोंदणी पुराव्यासह लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी देशाच्या वेशीवर टांगली! यावरून भारतिय निवडणूक प्रक्रिया चपटी, कोंबडं, बकरं, लक्ष्मीदर्शन याच्या कितीतरी पुढे गेल्याचे दिसून येत आहे!

१९४७ साली देश स्वतंत्र झाला. २६ जानेवारी १९५० ला देशाने आपले संविधान स्वीकारले. १९५२ साली देशातील पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली. त्यानंतर २०२४ साली अठराव्या लोकसभेसाठी देशातील जनतेने मतदान केले. मतदान प्रक्रिया अधिकाधिक निष्पक्ष, पारदर्शक करून लोकशाही अधिकाधिक मजबूत करण्या ऐवजी, मिळालेली सत्ता वंश परंपरेने आपल्याच घरात कशी राहील याचा विचार सत्ताधीशांनी केला. त्यातूनच चपटी, कोंबडं, बकरं, लक्ष्मीदर्शन देवून मतदार वशीकरण योजना राबवली गेली. साम दाम दंड भेद या नीतीचाही पुरेपुर वापर करण्यात आला. त्यानंतर मागील दहा वर्षांत आमदार खरेदी करून सरकारे पाडली आणि बनवली गेल्याचे लोकशाही हत्येचे अनेक अंक रंगल्याचे देशवासियांनी याची देही याची डोळा पाहिले. त्यापूर्वी ईडी, सीबीआय, न्य आदि केंद्रीय तपास यंत्रणां, राज्यपाल, न्याय संस्था यांचा वापर करून महाराष्ट्रात उध्दव ठाकरे सरकार पाडण्यात आले. हा लोकशाहीवरील अत्याचारच म्हणावा लागेल! माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी दिलेल्या अर्धसत्य कबुली जबाबाने भारतीय लोकशाहीची जर्जर अवस्थेचे भयाण चित्र समोर आणलं आहे.लोकशाहीत देशाचे मालक 'लोक'...पण... याची त्यांनाच जाणीव नाही! 'सेवकां'नाच ते 'मालक' समजून बसलेत आणि सेवकांनी मग असले 'उद्योग' सुरू केले आहेत. त्यामुळे दिडशे वर्षाच्या संघर्षातून आणि बलिदानातून मिळालेलं स्वातंत्र्य आणि लोकशाही धोक्यात आली आहे. लोकशाही व्यवस्थेत लोक आपले प्रतिनिधी निवडतात. लोकांनी निवडलेले प्रतिनिधी सरकार निवडतात. ते सरकार लोकांच्या वतीने कारभार करते. लोकांना प्रतिनिधींचा कारभार पसंत पडला तर मतदार त्यांना पुनश्च संधी देतात, नाही आवडला तर बदल करतात. परंतु लोकांची गरीबी, अज्ञान, मजबुरी यांचा गैरफायदा घेऊन पैसे पेरा पैसे काढा प्रवृत्तींनी लोकशाही हायजॅक केली आहे. त्यांनी लोकांचा विकास गिळंकृत केला आहे. देशातील सरकारी उद्योग म्हणजे जनतेची संपत्ती जवळपास विकून टाकली आहे. शिक्षणाच्या खाजगीकरणाने ते गरिबांच्या आवाक्यात राहणार नाही अशी वाईट परिस्थिती निर्माण झाली आहे. नेते निवडून आले तर त्यांना सत्ता मिळते आपल्याला काय मिळते? कुणीही निवडून आला तर आपल्याला काय करायचं? त्यापेक्षा मिळतेय खायला मटण तर घ्या खाऊन! मिळतेय दारू प्यायला तर घ्या पिऊन!! आणि मिळतायत पैसे तर घ्या!! अशी मानसिकता बऱ्याच लोकांची झाली आहे. ही संख्या निवडणुकीचे निकालावर प्रभाव टाकण्या इतपत वाढली आहे. त्यामुळे चांगली माणसं निवडणुकीत टिकत नाहीत. ही परिस्थिती बदलावी लागेल. मतदानासाठी चपटी, कोंबडं, बकरं, लक्ष्मीदर्शनाचे अमित दाखवणारे लोकशाहीचे म्हणजेच मानवतेचे शत्रू आहेत. या प्रवृत्ती ठेचून काढाव्या लागतील. तरच लोकशाही वाचेल....



-राजकुमार कदम, बीड

◆ पान १ वरून पुढे...

## 'महिला डॉक्टरचे...

दावा चाकणकर यांनी केला होता. त्यांच्या या विधानानंतर आता मंत्री जयकुमार गोरे यांनीही त्याच सुरात सूर मिसळला. जर चॅट समोर आले, तर सगळे सत्य स्वीकारावे लागेल. आपली संस्कृती असं करायला लावत नाही, कुणीही यात राजकारण करू नये, असे गोरे म्हणाले आहेत. मंत्री गोरे आणि चाकणकर या दोघांनीही केलेल्या विधानांमुळे मृत महिला डॉक्टरच्या खाजगी आयुष्यावर लक्ष केंद्रित केले जात आहे आणि या दोघांच्या विधानांमुळे या प्रकरणाला आता राजकीय रंग मिळाला आहे. विरोधकांनी हे विधान म्हणजे सत्ताधाऱ्यांकडून केलेलं चारित्र्यहनन असल्याचं म्हटले आहे. या प्रकरणात पहिल्या दिवसापासून आक्रमक असलेल्या शिवसेनेच्या (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेत्या सुषमा अंधारे यांनी मंत्री जयकुमार गोरे यांच्या विधानावरून जोरदार टीका केली. त्यांनी गोरे आणि रुपाली चाकणकर यांना उद्देशून एक कथा सुनावत त्यांच्या भूमिकेवर तीव्र आक्षेप घेतला आहे.

## गाडी गहाण...

एम. एच. १२ डब्ल्यूके २२७६ असा आणि ती गाडी प्रताप शेषेराव राठोड (रा. पुणे जि. पुणे) याच्या नावावर होती. त्यांना थार गाडीचे आकर्षण असल्याने त्यांनी त्या गाडी मालकाला परळीला बोलवून घेण्यास सांगितले. त्यानंतर दुपारी चार ते साडेचार वाजता संजय याने त्यांना फोन करून गाडी मालक केजला असून पाच लाख रुपये घेऊन त्याच्याकडे जाऊ असे सांगितले. राहुल कांदे हे त्यांचा मित्र आनंद मुंजाजी धाटे (रा. भिमवाडी परळी) कलीम पटेल, (रा. आजाद नगर परळी), नितीन तौर (रा. साठेगल्ली परळी) यांना घेऊन जीपने अंबाजोगाईला आले. तेथून संजय पवार व त्याचा मित्र शहबाज खान (रा. हबीबपुरा परळी) गाडीत बसले. ते सर्व धारूरला आले. त्या ठिकाणी गाडी मालक प्रताप राठोड व गणेश नडगीरे (रा. धारुर) हे भेटले. त्यांनी केजला येऊन एका कॉम्प्युटर सेंटरमध्ये जाऊन बॉन्डवर करारनामा टाईप केला. रात्री दहा वाजता ऍड. प्रगती केशवराव केंद्रे (रा. शिक्षक कॉलनी केज) यांच्या घरी जाऊन सदर करारनाम्याबाबत नोटरी केली. त्यांना पैसे देऊन थार गाडी घेऊन मध्यरात्री १ वाजता परळीला गेले. त्यांनी ही गाडी समोर लावून झोपले. त्यानंतर सकाळी सहा वाजता झोपेतून उठले, घरासमोरून गाडी गायब झाली होती. ते पोलीस ठाण्यात तक्रार देण्यास गेले असता रवी मुंडे (रा. अंबाजोगाई) याने ती गाडी गाडीचा मालक प्रताप राठोड हाच घेऊन गेल्याचे व तो तुमचे पैसे परत देणार असल्याचे सांगितले. तो तुमचे पैसे दोन ते तीन दिवसात परत करणार असे सांगितल्याने ते परत घरी आले. त्यानंतर त्यांना पैसे मिळून जातील, असे सांगून आतापर्यंत

◆ पान १ वरून पुढे...

पैसे न देता त्यांची फसवणूक केली. शेवटी १ नोव्हेंबर रोजी राहुल कांदे यांनी दिलेल्या तक्रारीवरून संजय पवार, शहबाज खान, रवि मुंडे, गणेश नडगीरे, प्रताप राठोड या पाच जणांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. तपास फौजदार जावेद कराडकर हे करीत आहेत

## श्रीकाकुलममधील....

सुरू केले. जखमींना जवळच्या सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. जिल्हा प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे आणि परिस्थिती नियंत्रित करण्यासाठी अतिरिक्त पोलिस दल तैनात करण्यात आले आहे. प्रत्यक्षदर्शींचे म्हणणे आहे की सकाळपासूनच मंदिरात गर्दी लक्षणीयरीत्या वाढली होती आणि पुरेशा सुरक्षा व्यवस्थेअभावी परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली. स्थानिक प्रशासनाने या घटनेची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

## शेत रस्त्यांसाठी....

समितीच्या शिफारशीवरून झाला निर्णय- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार, नागरिकांचे जीवनमान सुकर करणे या उद्देशाने पुणे विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष अभ्यास समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने राज्यातील विविध जिल्ह्यांतील शेतरस्ते आणि वहिवाटीच्या रस्त्यांवरील वादग्रस्त प्रकरणांचा सखोल अभ्यास केला. या अभ्यासातून असे स्पष्ट झाले की, अनेक प्रकरणांमध्ये तहसीलदारांनी आदेश दिल्यानंतरही प्रत्यक्षात रस्ता उपलब्ध करून दिला जात नव्हता. त्यामुळे आदेश कागदावर राहून शेतकरी आणि नागरिकांना प्रत्यक्ष फायदाच मिळत नव्हता. याच समस्येवर उपाय म्हणून महसूलमंत्र्यांनी निर्णायक निर्णय घेतला आहे.

नवीन आदेशातील प्रमुख तरतुदी- सात दिवसांत अंमलबजावणी सक्तीची - तहसीलदार किंवा सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची सात दिवसांत प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे बंधनकारक असेल.

दस्तऐवजीकरण सक्तीचे - तयार केलेला पंचनामा आणि छायाचित्रे संबंधित प्रकरणाच्या मूळ संचिकेमध्ये समाविष्ट करणे अनिवार्य असेल.

प्रकरण बंद करण्यावर निर्बंध - आदेशाची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाल्याशिवाय कोणतेही प्रकरण बंद करता येणार नाही. म्हणजेच फक्त कागदावर आदेश देऊन प्रकरण संपवण्याची पद्धत थांबणार आहे.

कायदेशीर बंधन - हा निर्णय मामलेदार न्यायालय अधिनियम, १९०६ (कलम ५) आणि महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (कलम १४३) अंतर्गत लागू राहील. अधिकाऱ्यांवर वाढली जबाबदारी- या आदेशामुळे महसूल विभागातील अधिकाऱ्यांवर प्रत्यक्ष अंम

◆ पान १ वरून पुढे...

लबजावणीची जबाबदारी निश्चित झाली आहे. आदेश दिल्यानंतर अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई होण्याची शक्यता आहे. शासन आता प्रत्येक प्रकरणाची पडताळणी डिजिटल माध्यमातून करणार असून, रस्ता प्रत्यक्ष खुला झाला आहे की नाही, याची खात्री शासनस्तरावरून केली जाईल.

## राज्यस्तर शालेय ...

जिल्हा क्रीडा अधिकारी मा. श्री. अरविंद विद्यागर, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी मा.प्रा.जे.पी. शेळके, जिल्हा व्हॉलीबॉल संघटनेचे सचिव मा. श्री. शकील अहेमद, मा. प्रा. गोपाळ धांडे, जेष्ठ क्रीडा संघटक मा. डॉ. अविनाश बारगजे, अमन व्हॉलीबॉल क्लब, बीडचे अध्यक्ष तथा प्रशिक्षक मा. श्री. शेख शारेक यांचे प्रमुख उपस्थितीत १७ वर्षाखालील मुले व मुली राज्यस्तर शालेय व्हॉलिबॉल स्पर्धेचे उद्घाटन थाटात संपन्न झाले. उद्घाटन प्रसंगी मा. आ श्री. विक्रम काळे यांनी बीड जिल्हयाची क्रीडा संस्कृती चांगली असून जिल्हयातून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार होत असून जिल्हयाचे नाव देशपातळीवर व जागतिक पातळीवर उंचावत आहे. जिल्हयातील खेळाडूंना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा मिळाव्यात म्हणून राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हयाचे पालकमंत्री मा. ना. श्री. अजित पवार साहेब यांनी जिल्हा क्रीडा संकुल, बीड करिता २५ कोटी रूपये मंजूर केलेले आहेत असे प्रतिपादन केले.

## मैदान मारणारं....

सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ येथील असलेला सिकंदर शेख याच्या घरी स्मशान शांतता आहे. घरात आई, वडील, पत्नी, एक भाऊ, भावजय आणि चुलते असा परिवार असून संपूर्ण परिवाराला मोठा धक्का बसला आहे. सिकंदर शेख याचे वडील पैलवान रशीद शेख यांनी त्यांची भूमिका मांडताना स्पष्टपणे सांगितलं आहे की, 'सिकंदरने अतीशय मेहनतीनं आणि कष्ट करून नाव कमविले आहे. अवैध शस्त्र प्रकरणात त्याला गोवलं जात आहे. मी आणि माझी बायको हज करून आलोय, आम्ही लबाड बोलत नाही. माझा मुलगा सिकंदर हा हिंद केसरीची तयारी करत होता. त्याअगोदर ही घटना घडणं म्हणजे, काहीतरी षडयंत्र आहे', असा आरोप सिकंदरचे वडील रशीद शेख यांनी केला आहे.

## पुढील आठवड्यात...

आणि पंचायत समितीच्या निवडणुकीची सुद्धा घोषणा निवडणूक आयोगाकडून केली जाऊ शकते. तर शेवटच्या टप्प्यात महापालिका निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता आहे. दरम्यान, महापालिका,

◆ पान १ वरून पुढे...

नगरपालिका, नगर पंचायती, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका तीन टप्प्यांत पार पाडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. नगरपालिका आणि पंचायतीच्या निवडणुकीसाठी नोव्हेंबरमध्ये मतदान होईल. नगरपालिका निवडणुकीची घोषणा सोमवारी किंवा मंगळवारी केली जाण्याची शक्यता वर्तविली जाते. यामुळे राज्यात आचारसंहिता लागू होईल. मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका १५ ते २० जानेवारी २०२६ च्या आत घेण्याचा घेण्याचा आयोगाचा प्रयत्न राहणार आहे. नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी नोव्हेंबरमध्ये मतदान होईल. नगरपालिका निवडणुकीची प्रक्रिया सुरू असताना किंवा मतदानानंतर लगेच जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीच्या निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर केले जाईल. अतिवृष्टी आणि पुरामुळे सरकारी यंत्रणा अजूनही ग्रामीण भागातील मदतकार्यात गुंतलेली आहे. त्यामुळे या निवडणुका डिसेंबरमध्ये होणार असल्याचे खात्रीलायकरित्या समजते. जिल्हा परिषद निवडणुकीची प्रक्रिया सुरु असतानाच महापालिका निवडणुकांची घोषणा होऊ शकते.

## १३ कोटी...

लक्ष न दिल्याचे स्पष्ट होत असून, गुणनियंत्रक विभागामार्फत चौकशी करून दोषींवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे. त्यांनी यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना लेखी तक्रार सादर करून आंदोलनाचा इशारा दिला आहे. अजितदादा पवार यांनी बीड दौऱ्यावर असताना कामाचा गुणवत्ता दर्जा उत्कृष्ट असला पाहिजे, निकृष्ट काम करणाऱ्यांना ब्लॅकलिस्टमध्ये टाकण्यात येईल असा इशारा दिला होता. मात्र, एवढ्या कोटींचा खर्च करून बांधलेल्या बसस्थानकात उद्घाटनाआधीच गळती लागल्याने, पालकमंत्र्यांनी ठोस निर्णय घेऊन दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

## सत्ताधाऱ्यांना तब्बल...

हिंसाचाराला सुरुवात झाली. मुख्य विरोधी पक्ष असलेल्या चडेमा पार्टीनं दिलेल्या माहितीनुसार, गेल्या तीन दिवसांत झालेल्या हिंसाचारात ७०० जणांचा मृत्यू झाला आहे. देशाची आर्थिक राजधानी दार-एस-सलाम, वायव्य शिनयांगा आणि पूर्व मोरोगोरो परिसरात सुरक्षा दलांनी जमावावर बेछूट गोळीबार केला. अश्रूधुराच्या नळकांड्या फोडण्यात आल्या. परिस्थिती नियंत्रणात असल्याचा दावा सरकारकडून करण्यात आला आहे. पण हिंसाचाराचे फोटो अजूनही समोर येत आहेत.

◆ पान ४ वरून पुढे...

## महसूल व पोलिस....

भविष्यात संपूर्ण बीड जिल्हा ओसाड होण्याची शक्यता असल्याची गंभीर चिंता पर्यावरण प्रेमींनी व्यक्त केली आहे. सोलापूर जिल्ह्यातील मुरुम उपसा प्रकरणात धाडसी कारवाई करणाऱ्या अंजना कृष्णा (सहाय्यक पोलीस अधीक्षक) यांना मिळालेल्या धमक्या पाहता बीडमधील प्रशासनाकडून कारवाईची अपेक्षा ठेवणे अवास्तव आहे. त्यामुळेच बालाघाटाच्या डोंगररांगांच्या रक्षणासाठी पंकजाताई मुंडेंनी पुढाकार घ्यावा, अन्यथा जिल्ह्याचे पर्यावरणीय संतुलन धोक्यात येईल, असे आवाहन डॉ. गणेश ढवळे यांनी केले आहे.

## महेश (कडा)...

सरकारचे अप्पर सचिव सुनील सुवर्णकार यांनी याबाबत महेश कारखान्याच्या मालकांना कळवले आहे. कडा सहकारी साखर कारखान्याच्या मूळ सभासदांची वाट लावून भीमराव धोंडे या कारखान्याचे मालक बनलेले आहेत त्यांनी चुकीच्या सल्ल्यावरून महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे १९ कोटी रुपये भरून कारखाना सुरू करण्याचा प्रयत्न केला ही बाब चांगली असल्यामुळे मी त्यांच्या विरोधात कुठेही काही बोललेलं नाही अथवा तक्रार केलेली नाही परंतु त्यांनी कारखाना परिसरातील काही तिरमली आणि मागासवर्गीय कुटुंबीयांना परिसरातून हाकलून देण्याचा प्रयत्न केला. वास्तविक पाहता त्यांनी १९ कोटी रुपये भरण्याऐवजी

◆ पान ४ वरून पुढे...

साखर आयुक्त कार्यालयाकडून मार्गदर्शन घेणे गरजेचे होते आणि त्यानंतर पैसे भरण्याची आवश्यकता होती गेली १४ वर्षे कारखाना बंद असताना आमदार सुरेश धस यांनी साखर कारखान्याचे लायसन्स रद्द केले असे म्हणत आहेत कोणत्याही आमदाराला कोणत्याही साखर कारखान्याचा परवाना रद्द करण्याचा अधिकार असता तर राज्याला एकही कारखाना सुरू राहणार नाही. केवळ महेश साखर कारखान्याचा परवाना रद्द झाला नसून महाराष्ट्रातील आणखी १७ सहकारी अथवा खाजगी कारखाने असून १९ कारखाने कर्नाटकातील आहेत या सर्व कारखान्यांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. भीमराव धोंडे यांनी माझ्या विरुद्ध निवडणूक लढवून ते पराभूत झाले भारतीय जनता पार्टीच्या विरुद्ध काम केले तरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दि.२९ एप्रिल २० २५ रोजी केंद्र शासनाकडे त्यांना लायसन्स पुन्हा मिळावे यासाठी पत्र दिले. तत्पूर्वी साखर आयुक्तांनी त्यांचा प्रस्ताव नाकारला दिल्ली येथील वाणिज्य विभागाने प्रस्ताव नाकारला अखेर भीमराव धोंडे यांनी उच्च न्यायालयाच्या खंडपीठांमध्ये दि.१८ ऑगस्ट २० २५ रोजी लबाडी करून सन २०१८, २०१९ मध्ये गाळप परवाना मिळाल्याचे खोटे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. तरी मी काहीही बोललेलो नाही मी अंभोरा येथे कारखाना सुरू करण्याचा प्रयत्न केला जयदत्त ऍग्रो या नावाने मला लायसन मिळाले होते परंतु मी मुदतीमध्ये चालू न केल्यामुळे जयदत्त ऍग्रो चे देखील लायसन रद्द झाले मी पुन्हा प्रयत्न केला परंतु जयदत्त ऍग्रो या नावाने पुन्हा लायसन्स मिळणार नाही असा कायदा असल्यामुळे मी साईराम या नावाने नवीन नोंदणी करून दोन-तीन वर्ष अथक प्रयत्न

◆ पान ४ वरून पुढे...

केल्यामुळे मला दि.११ मार्च २०२५ रोजी लायसन्स प्राप्त झाले आहे. दोन कारखान्यामधील अंतराचे केंद्र शासनाचे आणि महाराष्ट्र शासनाचे वेगळे नियम आहेत त्यानुसार सर्व तपासण्यापूर्ण होऊन ना हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतर आमच्या कारखान्यास लायसन्स मिळालेले आहे.

## मैथिली सुरेश...

उत्कृष्ट कामगिरी साकारली.तिला या टप्प्यापर्यंत पोहोचविण्यासाठी क्रीडा मार्गदर्शक अजिम शेख आणि दिपाली काकडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल आमदार सुरेश धस, प्राजक्ता धस,देवस्थानचे सर्व ट्रस्टी,अनिषा ग्लोबल स्कूलचे प्राचार्य अविनाश राऊत,तपन गौडा, शिक्षकवर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी मैथिलीचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## डॉ. संपदा मुंडे...

लिहून आत्महत्या केली नसून हत्या करण्यात आली आहे ,यास सर्वशी राजकीय नेते व प्रशासन जबाबदार असून मेडिकल रिपोर्ट फिट प्रमाणपत्र बदलून देण्यासाठी मोठे शेडयंत्र रचून लैंगिक शारीरिक छळ मानसिक त्रास दिलेल्या असल्यामुळे मा उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशा मार्फत संपूर्ण प्रकरणाची निपक्ष पद्धतीने तपासणी मुद्देनिहाय करून कायदेशीर गुन्हेगारावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी कॉंग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी शासनाकडे केली .

◆ पान ४ वरून पुढे...

## अखिल भारतीय...

यानंतर देवगिरी प्रांताचे अध्यक्ष डॉक्टर विलास मोरे यांचा सन्मान चित्र देशपांडे व विजयाताई यांनी केला. पाहुणे श्री अण्णा कोपूलवार यांचा सन्मान विद्या खिस्ते , तारावती अग्रवाल, व संध्या सरोदे यांनी केला.

अखिल भारतीय ग्राहक पंचायत चा प्रस्तावना - विजयाताई यांनी केला.अखिल भारतीय ग्राहक पंचायत काय आहे. याबद्दल थोडक्यात सांगून. तारीख वाईज वर्षभरात घेतलेल्या मीटिंगची माहिती विजयाताईनी सांगितली. वर्षभर केलेल्या कार्यक्रमाचा आढावा चित्रताई देशपांडे यांनी सांगितला. सूत्रसंचलन संध्या सरोदे यांनी केले. अध्यक्षीय भाषणात डॉक्टर विलास मोरे यांनी खूप छान प्रकारे मार्गदर्शन केले. नवीन मेंबरला अखिल भारतीय ग्राहक पंचायत चे ध्येय व उद्दिष्ट, अगदी सोप्या शब्दात समजावून सांगितले. आभार प्रदर्शन अडवोकेट अशोक शहाणे यांनी केले.

कार्यक्रमासाठी श्री दिलीप जोशी, श्री जालंदर नाईकवाडे, जयश्री माने. अनिता मानवतकर, मंगल भोयटे, सुनंदा निर्मळे, चित्रा देशपांडे, विजयाताई दहिवाळ, तारावती अग्रवाल, विद्या खिस्ते, संध्या सरोदे, सुनिता बोडके, श्री अण्णा कोपूलवार, श्री चेतन सौंदळे, पद्माकर उखळीकर इ. उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी चित्राताई देशपांडे, विजयाताई दहिवाळ, विद्या खिस्ते, व संध्या सरोदे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रम खेळीमेळीच्या वातावरणात पार पडला. नवीन सर्व पदाधिकाऱ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# मोंथा चक्रीवादळाचा राज्यावर होणार परिणाम, पुढील चार दिवस पावसाचा अंदाज

## राज्यातील तापमानात चढ-उताराची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. गेले काही दिवस मुंबईसह इतर भागात पावसाने हजेरी लावली...

**मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय हवामान विभागाने महाराष्ट्रासाठी पावसाचा इशारा जारी केला आहे. नवीन कमी दाबाच्या क्षेत्रामुळे मुंबई, कोकण, नाशिक आणि धुळेसह अनेक जिल्ह्यांमध्ये हलका ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. काही भागांसाठी भारतीय हवामान विभागाने 'यलो अलर्ट' आणि 'हाय अलर्ट' जारी केला आहे.

हवामान खात्याचा अंदाज आहे की पुढील २४ तास मुंबई आणि त्याच्या उपनगरात हलक्या ते मध्यम पावसासह ढगाळ वातावरण राहील. अधूनमधून जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे. कमाल आणि किमान तापमान २९ओउ आणि २५ओउ च्या आसपास राहण्याची अपेक्षा आहे.

अनेक जिल्ह्यांसाठी 'यलो अलर्ट' जारी– पुढील एक ते दोन दिवस महाराष्ट्रात मुसळधार पाऊस सुरू राहील आणि भारतीय हवामान खात्याने अनेक भागांसाठी 'यलो अलर्ट' जारी केला आहे. या काळात राज्यात हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज आहे. भारतीय हवामान खात्यानुसार, कोकण, रायगड, सिंधुदुर्ग, ठाणे आणि पालघर येथे हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. नाशिक, नंदुरबार, जळगाव आणि धुळे येथे जोरदार वाऱ्यासह पाऊस पडेल आणि हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. अहिल्यानगरमध्ये हलक्या ते मध्यम पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हवामान




विभागाच्या मते, आज चार कोकण जिल्ह्यांसाठी (रायगड, सिंधुदुर्ग, ठाणे आणि पालघर) पिवळा इशारा जारी करण्यात आला आहे. दरम्यान, आज मध्य महाराष्ट्रासाठी वादळाचा इशारा देण्यात आला आहे आणि नाशिक, नंदुरबार, जळगाव आणि धुळे या चार जिल्ह्यांसाठी हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

पावसामुळे शेतकरी अडचण– गेल्या काही महिन्यांपासून मराठवाड्यात मुसळधार पाऊस पडत आहे. या वर्षी राज्यात या भागात सर्वाधिक पाऊस पडला आहे आणि या पावसामुळे मराठवाड्यातील शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. या नुकसानानंतरही पाऊस कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत. हवामान विभागाने पुन्हा एकदा मराठवाड्यासाठी पावसाचा इशारा जारी केला आहे. त्यानुसार, मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये हलक्या ते मध्यम पावसाची अपेक्षा आहे. संततधार पावसामुळे येथील शेतकरी चिंतेत आहेत.

तीन दिवस महत्त्वाचे– हवामान विभागाच्या मते, १ नोव्हेंबर रोजी कोकण–गोवा जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडला. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडा जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. २ नोव्हेंबर रोजी कोकण–गोवा, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडा जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. ३ नोव्हेंबर रोजी कोकण–गोवा, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडा जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.

मोंथा चक्रीवादळाचा कसा होतोय परिणाम? मोंथा चक्रीवादळ निवळल्यानंतर छत्तीसगड राज्यात ठळक कमी दाब क्षेत्राची निर्मिती झाली आहे. दरम्यान, पुढील चार ते पाच दिवस राज्यातील काही भागात पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

छत्तीसगडमध्ये तयार झालेली हवामान प्रणाली ईशान्येकडे वाटचाल करीत असून झारखंडच्या वायव्य भागात आहे. ही प्रणाली उत्तर वायव्येकडे वाटचाल करीत बिहार ओलांडल्यानंतर त्याची तीव्रता कमी होण्याचा अंदाज आहे. गेले काही दिवस मुंबईसह इतर भागात पावसाने हजेरी लावली. त्यामुळे तापमानात काहीशी घट होऊन दिलासा मिळाला होता. आता मात्र पुन्हा तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. ढगाळ वातावरण मधूनच पाऊस अशा वातावरणामुळे तापमानात चढ–उतार शक्य आहे.

## सुधारित अनुदान योजनेसाठी 14 नोव्हेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**मुंबई । प्रतिनिधी**

अल्पसंख्याक विकास विभागामार्फत अल्पसंख्याक बहुल शासन मान्यताप्राप्त खासगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग शाळांमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी सुधारित अनुदान योजना सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत अनुदान मिळवू इच्छिणाऱ्या अटी व शर्तींची पूर्तता करून विहित नमुन्यातील अर्जासह संपूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी, मुंबई शहर (जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई – ४००००१) येथे १४ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत सादर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाने केले आहे.

अर्जाचा नमुना https://mdd.maharashtra.gov.in यावर उपलब्ध आहे. निर्धारित दिनांकानंतर प्राप्त होणारे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. प्रस्ताव सादर करण्याचा अंतिम दिनांक १४ नोव्हेंबर असून, जिल्हाधिकारी कार्यालयाने प्राप्त प्रस्तावांची छाननी करून, त्रुटींची पूर्तता करून, अंतिम पात्र प्रस्ताव शासनास सादर करण्याचा अंतिम दिनांक – १५ डिसेंबर, २०२५ पर्यंत आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर येथे अथवा दूरध्वनीः ०२२-२२६६०१६७, ई-मेलः dpomumbaicity@gmail.com यावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## बीडमध्ये संत ज्ञानेश्वर महाराज जीवन चरित्र कथेचे भव्य आयोजन साडेसातशेवी जन्म जयंतीनिमित्त साध्वी अनुराधा दीदींच्या संगीतमय कथेतून जीवनप्रेरणा

**बीड । प्रतिनिधी**

संत ज्ञानेश्वर महाराज यांची साडेसातशेवी जन्म जयंती सध्या संपूर्ण विश्वभर उत्साहात साजरी होत आहे. गेल्या बारा महिन्यांपासून संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या जीवनावर विविध कार्यक्रमांचे आयोजन देशभर करण्यात येत असून, शासन स्तरावरही हा उत्सव भव्य स्वरूपात साजरा केला जात आहे. या पार्श्वभूमीवर, बीड शहरात गेल्या पंचवीस वर्षांपासून संत विचार पेरण्याचे कार्य करणारे स्वर्गीय झुंबरलालजी खटोड सामाजिक



प्रतिष्ठान, बीड यांच्या वतीने 'संत ज्ञानेश्वर महाराज जीवन चरित्र कथा' या भव्य धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम ५ नोव्हेंबर ते ९ नोव्हेंबर २०२५ दरम्यान यशवंतराव चव्हाण



नाट्यगृह, बीड येथे आयोजित करण्यात येणार आहे. दररोज सकाळी १० ते सायंकाळी १० वाजेपर्यंत विविध सत्रांमध्ये ही कथा पार पडणार आहे. या प्रसंगी पंढरपूर येथील साध्वी अनुराधा दीदी आपल्या सुरेल वाणीमधून संत ज्ञानेश्वर महाराजांचे जीवन चरित्र कथन करणार आहेत. संगीतमय शैलीतून त्या संत ज्ञानेश्वर महाराजांचे जीवन, कार्य आणि तत्त्वज्ञान यांचा प्रेरणादायी पट श्रोत्यांसमोर मांडतील.

कार्यक्रमाचे आयोजन स्वर्गीय झुंबरलालजी खटोड सामाजिक प्रतिष्ठान, बीड यांच्या वतीने करण्यात आले असून, सर्व बीडकर भाविक भक्तांना या पाच दिवसीय संत चरित्र कथेचे श्रवण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सर्व भाविक भक्तांना प्रवेश विनामूल्य आहे.

## जिल्ह्यातील 8 हजार बचत गटांच्या माध्यमातून 80 हजार महिलांना सक्षम करु: पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**नागपूर। प्रतिनिधी**

नारी शक्तीच्या सर्वांगिण विकासासाठी उमेद सारखी संस्था आपण निर्माण केली. उमेदमार्फत शहरी भागासह प्रत्येक गावखेड्यातील महिलांना विकासाच्या प्रवाहात येता यावे, त्यांना आपल्या व्यवसायाला साकार करता यावे यादृष्टीने जिल्ह्यातील ८ हजार बचत गटांमार्फत ८० हजार महिलांना सक्षम करु, असे प्रतिपादन राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. जिल्हा खनिज प्रतिष्ठान, जिल्हा परिषद यांच्या वतीने 'नवसखी उद्योगिनी योजनेच्या' शुभारंभ कार्यक्रमात ते बोलत होते.



कोराडी येथील महालक्ष्मी जगदंबा संस्थान परिसरातील ज्योत भवन येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राज्याचे वित्त राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार चरणसिंह ठाकूर, आमदार डॉ. आशिष देशमुख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, माजी आमदार टेकचंद सावरकर, पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते.

# उमरखेड उपजिल्हा रुग्णालयात आता विनामूल्य डायलिसिस सुविधा

**• पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते मोफत डायलिसिस सेंटरचे उद्घाटन**

**यवतमाळ । प्रतिनिधी**

यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते आज जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे दूरदृश्य प्रणालीद्वारे उमरखेड येथील ८ खाटांच्या मोफत डायलिसिस सेंटरचे उद्घाटन करण्यात आले.

यामुळे उमरखेड आणि लगतच्या परिसरातील किडनी (मूत्रपिंड) आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांना मोफत उपचार उपलब्ध




होणार असल्याने दिलासा मिळेल, असा विश्वास पालकमंत्री संजय राठोड यांनी व्यक्त केला.

उमरखेड तालुक्यात कार्यरत असलेल्या १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात हे अत्याधुनिक डायलिसिस सेंटर स्थापन करण्यात आले आहे. परिसरातील रुग्णांची वाढती संख्या आणि उपचारांची गरज लक्षात घेऊन हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

यावेळी बोलताना पालकमंत्री श्री. राठोड म्हणाले की, या मोफत डायलिसिस सेंटरमुळे उमरखेड परिसरातील नागरिकांचे आरोग्य सुलभ होणार आहे. आतापर्यंत रुग्णांना उपचारासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी किंवा मोठ्या शहरांमध्ये जावे लागत होते, ज्यामुळे त्यांना प्रवासाचा मोठा ताण सहन करावा लागत होता आणि उपचारांवरील आर्थिक भुर्दंड सोसावा लागत होता. आता हे मोफत केंद्र सुरू झाल्यामुळे नागरिकांचा हा त्रास दूर होईल आणि त्यांना वेळेवर व सोयीस्कर मोफत उपचार मिळतील. याप्रसंगी जिल्हाधिकारी श्री. विकास मीना, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुखदेव राठोड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी व परिचारिका उपस्थित होत्या. तसेच, उमरखेड येथे आमदार श्री. किसन वानखेडे, भाजपचे जिल्हा समन्वयक श्री. नितिन भुतडा, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. मांडण, वैद्यकीय अधीक्षक डॉ. डोंगे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शिंदे, श्री. चितंगराव कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

## कोल्हापूर जिल्ह्यात जनावरांच्या गोठ्यात बनावट नोटांचा छापखाना, टोळीचा पर्दाफाश

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमेवर बनावट नोटांचा सुळसुळाट सुरू असल्याचं वारंवार उघडकीला येतंय. सांगली पोलिसांनी याच महिन्याच्या सुरुवातीला तब्बल १ कोटी ११ लाख रुपयांच्या बनावट नोटा छापणा–या टोळीचा पर्दाफाश केला होता. ह्या नोटा कोल्हापुरात छापल्याचं समोर आलं होतं. ही घटना ताजी असताना कोल्हापूर जिल्ह्यातल्या उदगावात बनावट नोटांच्या रॅकेटचा पर्दाफाश झालाय. पाहुयात..

सांगली पोलिसांनी बनावट नोटा छापणा–या एका टोळीचा पर्दाफाश केला होता. तब्बल एक कोटींच्या बनावट नोटांसह मुद्देमाल जप्त केला होता. ही घटना ताजी असतानाच आता कोल्हापुरातल्या




शिरोळ तालुक्यातल्या उदगावात बनावट नोटांच्या रॅकेटचा जयसिंगपूर उपविभागीय पोलिसांनी पर्दाफाश केलाय. एका मागोमाग एक उघडकीस आलेल्या या घटना पाहता कोल्हापूर जिल्ह्यात बनावट नोटा छापणाऱ्या रॅकेटचा सुळसुळाट आहे का? असा प्रश्न उपस्थित होतोय. १००, २०० आणि ५०० च्या बनावट नोटा चलनात आणण्यासाठी मोठी यंत्रणा सक्रिय आहे का? असाही प्रश्न उपस्थित होतोय. त्यामुळेच तपास यंत्रणांनी मुळापर्यंत जाऊन या रॅकेटचा शोध घ्यायला हवा.. अन्यथा दैनंदिन व्यवहारात या बनावट नोटा आल्या तर ख–या नोटा कोणत्या आणि बनावट नोटा कोणत्या हे ओळखणंही अवघड होऊन जाईल..

# नोव्हेंबरमध्ये बँका 11 दिवस बंद राहणार, सलग तीन दिवसांची सुट्टी मिळणार

**मुंबई । प्रतिनिधी**

ऑक्टोबर महिना संपल्यानंतर आता नोव्हेंबर महिना सुरु झाला आहे. ऑक्टोबरमध्ये दसरा, धनत्रयोदशी, दिवाळीच्या सुट्ट्या संपल्या आहेत. नोव्हेंबर महिन्यात तुम्ही बँकेतील काही कामाचं नियोजन करत असताल तर तुम्हाला बँका किती दिवस बंद राहणार आहेत हे माहिती असणं आवश्यक आहे. नोव्हेंबर महिन्यात बँका ११ दिवस बंद राहणार आहेत. यामध्ये रविवार, दुसरा आणि चौथा शनिवार या दिवशी असणाऱ्या सुट्ट्यांचा देखील समावेश आहे.

भारताच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या कॅलेंडरनुसार नोव्हेंबर महिन्यात बँका काही ठिकाणी सणांच्या निमित्तानं बंद राहतील. ती राज्य सोडून इतर सर् राज्यांमध्ये बँकांचं कामकाज सुरु असेल. बँका जरी बंद असल्यातरी ग्राहक नेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, यूपीआय आणि एटीएम सारख्या डिजिटल सेवांच्या मदतीनं पैशांची देवाण घेवाण, बिल पेमेंट, शिल्लक तपासणी ही कामं पूर्ण करु शकतात.




१ नोव्हेंबर: कर्नाटक राज्य स्थापना दिवसानिमित्त कर्नाटकातील सर्व सरकारी आणि खासगी बँका बंद राहतील. दक्षिण भारतातील कन्नड भाषिकांचं मिळून कर्नाटक राज्य स्थापन केलं गेलं होतं. याच दिवशी डेहराडूनच्या सर्व बँका बंद राहतील, कारण तिथं इगास–बग्वाल सण साजरा केला जातो. ज्याला मोठी दिवाळी असं म्हटलं जातं.

५ नोव्हेंबर – या दिवशी बँका आयझोल, बेलापूर, भोपाळ, भुवनेश्वर, चंडीगड, डेहराडून, हैदराबाद, इटानगर, जयपूर, जम्मू, कानपूर, कोहिमा, कोलकाता, लखनौ, मुंबई, नागपूर, नवी दिल्ली, रायपूर, रांची, शिमला आणि श्रीनगरमध्ये गुरु नानक जयंती, कार्तिक पौर्णिमा आणि रहस पौर्णिमा सारख्या सणांमुळं बँका बंद राहतील.

६ नोव्हेंबर – नोंगक्रेम नृत्यानिमित्त शिलाँगमध्ये बँका बंद राहतील. ७ नोव्हेंबर – वांगला उत्सवानिमित्त सर्व बँका बंद राहतील.

८ नोव्हेंबर – बंगळुरुत कनकदास जयंतीनिमित्त बँका बंद राहतील. ११ नोव्हेंबर– सिक्कीममध्ये ल्हाबाब दुचेन निमित्त बँकांना सुट्टी राहणार आहे. बौद्ध धम्मासाठी खास दिवस आहे.

नोव्हेंबरमधील साप्ताहिक सुट्ट्या– २ नोव्हेंबर (रविवार), ८ नोव्हेंबर (दुसरा शनिवार), ९ नोव्हेंबर (रविवार) या दिवशी देशभरात बँका बंद राहतील.

१६ नोव्हेंबर (रविवार), २२ नोव्हेंबर (चौथा शनिवार) या दिवशी बँका बंद राहतील.

२३ नोव्हेंबर (रविवार) आणि ३० नोव्हेंबर (रविवार)

**सार्वजनिक सूचना**

**श्री/सौ. जयश्री राजेंद्र मस्के यांच्या नावावर असलेली प्लॉटची मूळ रजिस्ट्री हरवली आहे. संबंधित कागदपत्र शोधूनही मिळाले नाही.**

**सदर रजिस्ट्री प्लॉट क्रमांक ९, सर्वे क्रमांक ६६, ठिकाण – संत तुकाराम नगर, बीड येथील आहे.**

**कोणाला वरील रजिस्ट्री मिळाल्यास कृपया खालील पत्त्यावर अथवा दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.**

**नाव: जयश्री राजेंद्र मस्के**
**पत्ता: संत तुकाराम नगर, बीड**
**मो. नं.: ९८२२२९५२००**

दैनिक **मराठवाडा पत्र**
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर



## थोडक्यात...

### स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने आज गेवराई काँग्रेसची महत्त्वपूर्ण बैठक



**गेवराई । प्रतिनिधी**

आगामी काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने बीड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या सूचनेवरून दिनांक २ रविवार रोजी गेवराई तालुका काँग्रेस कमिटीच्या पदाधिकाऱ्यांची व कार्यकर्त्यांची महत्वपूर्ण बैठकीचे आयोजन शासकीय विश्रामगृह गेवराई या ठिकाणी सकाळी ११ वाजता करण्यात आल्याची माहिती गेवराई तालुका काँग्रेसचे अध्यक्ष महेश बेदरे व युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्रीनिवास बेदरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. येणाऱ्या काळात गेवराई तालुक्यातील नगरपरिषद व जिल्हा परिषद च्या होऊ घातलेल्या निवडणुकीसंदर्भात काँग्रेस पक्षाच्या वतीने बैठकीचे आयोजन केले असून या बैठकीस काँग्रेसचे ज्येष्ठ पदाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन केले असून प्रमुख उपस्थिती युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्रीनिवास बेद्रे हे उपस्थितीत राहणार आहेत तरी गेवराई तालुक्यातील सर्व काँग्रेस विचाराच्या पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांनी या बैठकीस बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आव्हान गेवराई तालुका काँग्रेसचे अध्यक्ष महेश बेदरे यांनी केले आहे.

### पंकजाताई मुंडे यांचे निष्ठावंत कार्यकर्ते गणेश लांडे यांनाच बहिरवाडी सर्कलसाठी उमेदवारी द्यावी: समीर बेग व मनोज गुंड यांची ठाम मागणी

**बीड । प्रतिनिधी**



बहिरवाडी जिल्हा परिषद सर्कलमध्ये येणाऱ्या आगामी निवडणुकीत भाजपचे जिल्हा सरचिटणीस गणेश लांडे यांनाच उमेदवारी द्यावी, अशी ठाम मागणी माळापुरीचे उपसरपंच समीर बेग व कुर्ल्याचे मनोज गुंड यांनी केली आहे. दोघांनीही सांगितले की, या सर्कलचा सर्वांगीण विकास आणि जनतेचा विश्वास मिळवू शकणारा नेता म्हणजे गणेश लांडे. पंकजाताई मुंडे यांच्या विचारांवर चालणारे, जनतेत मिसळणारे आणि नेहमी अग्रस्थानी राहून समाजकारण करणारे कार्यकर्ते म्हणून लांडे यांचे नाव सर्वत्र चर्चेत आहे. गरीब, शेतकरी, युवक, महिला – सर्वांच्या प्रश्नांवर थेटपणे आवाज उठवणारा, लोकांमध्ये राहून लोकांसाठी लढणारा नेता म्हणजे गणेश लांडे, असेही त्यांनी सांगितले. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त गणेश लांडे यांनी दरवर्षी सेवा पंधरवडा राबवून समाजहिताचे अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. वाढदिवस साजरा करायचा तर जनतेच्या सेवेतूनच – या विचारांचा अवलंब करणारा हा कार्यकर्ता खऱ्या अर्थाने जनतेचा नेता असल्याचे बेग व गुंड यांनी गौरवोद्गार काढले. समीर बेग व मनोज गुंड यांनी स्पष्ट केले की, बहिरवाडी सर्कलमध्ये विकास, संवाद आणि संघटनशक्ती या तिन्ही आघाड्यांवर सक्षम नेतृत्व गणेश लांडे यांच्याकडेच आहे. त्यामुळे या सर्कलसाठी उमेदवारी त्यांनाच द्यावी, अशी जोरदार मागणी त्यांनी केली आहे.

### सर्व पेन्शनर्स यांनी दि.१ नोव्हेंबर ते १० डिसेंबर पर्यंत हयात नामे सादर करावेत : इंजि.वजूरकर

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील सर्व पेंन्शनर धारकांनी दि.१ नोव्हेंबर ते १० डिसेंबर २०२५ पूर्वी हयात नामे आपल्या संबंधित विभागाकडे सादर करावे असे आवाहन पेन्शनर्स ॲण्ड सिनीयर सिटीझन्स असोसिएशनचे प्र.अध्यक्ष इंजि.आर.व्ही. वजूरकर यांनी केले आहे. प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे की, जिल्हा परिषद कडून पेन्शन मिळणारे पेन्शनर्स यांनी त्या-त्या पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी कार्यालयाकडे आणि कोषागार कार्यालयाकडून पेन्शन प्राप्त होणार्या पेन्शनर्संनी संबंधित बँकेच्या (स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र) शाखेत आपले हयात नामे सादर करावेत. हयात नाम्या सोबत आधार कार्ड, बँक आकॉऊंट झेराॅक्स आणि पीपीओ क्रमांक जोडावा असे आवाहन पेन्शनर्स ॲण्ड सिनीयर सिटीझन्स असोसिएशनचे प्र.अध्यक्ष इंजि. आर.व्ही. वजूरकर यांनी केले आहे.

### वोगस वृत्तपत्राच्या आधारे नागरिकांची फसवणूक करणाऱ्या तोतया पत्रकारावर कारवाईची मागणी

#### तहसील कार्यालय व पोलिस ठाण्यात अर्ज दाखल

**केज । प्रतिनिधी**

केज शहरात बोगस वृत्तपत्राच्या नावाखाली नागरिक, अधिकारी व कर्मचारी वर्गाची फसवणूक करणाऱ्या एका तोतया पत्रकारावर तातडीने कारवाई करण्यात यावी, अशी मागणी बाबासाहेब अंबादास मस्के यांनी पोलिस निरीक्षक, स्वप्नील उनवणे पोलिस ठाणे केज व तहसील कार्यालय यांच्याकडे लेखी अर्जाद्वारे केली आहे. अर्जात नमूद केल्याप्रमाणे, फुले नगर परिसरातील तात्या गवळी नावाच्या व्यक्तीने (आर.एन.आय.) क्रमांक नसलेल्या एका पच्या माध्यमातून बनावट वृत्तपत्र तयार करून खोट्या बातम्या प्रसारित केल्या आहेत. सदर व्यक्ती स्वतःला पत्रकार असल्याचे भासवून समाजातील तसेच प्रशासनातील अधिकाऱ्यांशी फसवणूक करीत असल्याचेही अर्जात नमूद आहे. तसेच, त्या व्यक्तीने स्वाभिमानी पत्रकार संघ या नावाने एक बोगस संघटना स्थापन करून स्वतःला अध्यक्ष घोषित केले असून, त्या पदाचा गैरवापर करून विविध ठिकाणी दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. अलीकडेच त्याने दीपावलीच्या निमित्ताने बनावट लेटरहेडच्या माध्यमातून आर्थिक उकळी केल्याचेही निदर्शनास आले आहे. बाबासाहेब मस्के यांनी म्हटले आहे की, अशा प्रकारच्या तोतया पत्रकारांच्या कृतींमुळे खऱ्या पत्रकारितेच्या प्रतिमेला धक्का बसत आहे. समाजात तसेच प्रशासनात फसवणूक, गोंधळ आणि अविश्वासाचे वातावरण निर्माण होत आहे. त्यामुळे अशा व्यक्तींवर कठोरात कठोर कायदेशीर कारवाई होणे आवश्यक आहे. या घटनेमुळे केज शहरात चर्चेचा विषय निर्माण झाला असून, स्थानिक नागरिक आणि पत्रकार संघटनांकडूनही अशा बोगस वृत्तपत्रांविरोधात कठोर भूमिका घेण्याची मागणी होत आहे.

# महसूल व पोलिस प्रशासनाच्या संगनमताने गौण खनिज माफियांचा धुमाकूळ

**पालकमंत्री अजितदादांकडून अपेक्षा नाही ; निदान पंकजाताई तुम्ही तरी बालाघाटावरील डोंगररांगा वाचवा ! : डॉ.गणेश ढवळे**

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील निसर्गसंपन्न बालाघाट डोंगररांगा महसूल आणि पोलिस प्रशासनाच्या संगनमताने चालणाऱ्या गौण खनिज माफियांच्या अवैध उत्खननामुळे पोखरून नष्ट होत आहेत. सामाजिक कार्यकर्ते व पर्यावरण प्रेमी यांच्याकडून सातत्याने तक्रारी होऊनही प्रशासनाने डोळेझाक केल्याचा आरोप होत आहे.

पालकमंत्री अजितदादा पवार हे स्वतःच या माफियांची पाठराखण करीत असल्याचे चित्र दिसत असल्याने त्यांच्याकडून कारवाईची अपेक्षा ठेवणे व्यर्थ ठरेल, अशी टीका सामाजिक



कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केली आहे. त्यांनी पर्यावरण व हवामान बदल मंत्री पंकजाताई मुंडे यांनी तातडीने हस्तक्षेप करून बालाघाट डोंगररांगा वाचवाव्यात, अशी मागणी केली आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील अवैध गौण खनिज उपसा आणि वाहतुकीत महसूल व पोलीस अधिकाऱ्यांच्या नातेवाईकांचीच वाहने गुंतलेली असल्याची चर्चा जनतेत आहे. यामुळे जिल्ह्यातील जंगल, झाडे, डोंगररांगा नामशेष होण्याच्या मार्गावर असून भूजल पातळी झपाट्याने खाली जात आहे, मातीची धूप वाढली आहे आणि ▶ उर्वरित पान २ वर

## महेश (कडा) सह.साखर कारखान्याचा परवाना सन २०१६/ १७ मध्येच रद्द झाला

**भीमराव धोंडे आत्तापर्यंत काय करत होते ? आजवर तुमच्या कारभाराच्या तक्रारी केल्या नाहीत मात्र आता लक्ष घालावे लागेल.... आ.सुरेश धस यांचे पत्रकार परिषदेतून प्रत्युत्तर..**

**आष्टी । प्रतिनिधी**

महेश (कडा) सहकारी साखर कारखान्याला सन २०११ मध्ये शेवटचा गाळप परवाना (लायसेन्स) देण्यात आला होता त्यानंतर शुगर कंट्रोल ऍक्ट १९६६ यामध्ये सुधारणा होऊन सन २००६ मध्ये मनमोहन सिंग पंतप्रधान असताना यूपीए सरकारने कोणताही सहकारी अथवा खाजगी साखर कारखाना पाच वर्षाहून अधिक काळ बंद असेल त्याचे गाळप झालेले नसेल तर नियमाप्रमाणे



त्यांचा गाळप परवाना (लायसेन्स) रद्द होत असते..या नियमानुसार (कडा) महेश सहकारी साखर कारखान्याचे लायसेन्स रद्द झाले आहे ..भीमराव धोंडे पराभूत झाले आणि मी आमदार झालो त्यामुळे मी लायसन रद्द केले आहे असे जाहीर सांगून त्यांनी माझी बदनामी केली आहे त्यामुळे आतापर्यंत त्यांच्या विरुद्ध कोणतीही तक्रार केली नाही परंतु आता त्यांच्या सर्व संस्थेतील गैरव्यवहाराच्या यापुढे तक्रारी करणार आहोत असे प्रत्युत्तर आमदार सुरेश धस यांनी दिले आहे. आपल्या निवासस्थानी घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते. ते पुढे म्हणाले ०८ एप्रिल २०२४ रोजी केंद्र

▶ उर्वरित पान २ वर

## मैथिली सुरेश धस हिची महाराष्ट्र राज्य हॅण्डबॉल संघात निवड




**आष्टी । प्रतिनिधी**

कामोठे (पनवेल) येथे दिनांक २८ ते ३० ऑक्टोबर २०२५ दरम्यान पार पडलेल्या शालेय राज्यस्तरीय हॅण्डबॉल स्पर्धा व निवड चाचणी या स्पर्धेत आष्टी येथील अनिषा ग्लोबल स्कूल येथील विद्यार्थिनी मैथिली सुरेश धस (वयोगट १७ वर्षांखालील मुली) हिने आपल्या उत्कृष्ट आणि प्रभावी कामगिरीच्या जोरावर महाराष्ट्र राज्य हॅण्डबॉल संघात स्थान पटकावले आहे. मैथिली हिच्या या उल्लेखनीय यशामुळे ती आता येत्या शालेय राष्ट्रीय हॅण्डबॉल स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार असून, तिच्या या कामगिरीने आष्टी तालुक्यासह संपूर्ण बीड जिल्ह्याचा मान उंचावला आहे.मैथिली हिने स्पर्धेत आपल्या चिकाटी, निष्ठा आणि सातत्यपूर्ण सरावाच्या बळावर ▶ उर्वरित पान २ वर

## डॉ. संपदा मुंडे हत्या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाचा न्यायाधीशांची नेमणूक करून सखोल चौकशी करून न्याय द्या : मुंडे

**परळी वै. । प्रतिनिधी**

डॉ संपदा मुंडे यांच्या हत्या प्रकरणी महाराष्ट्रातील मोठ्या प्रमाणात खळबळ माजली असून यास राजकीय नेते व प्रशासन जबाबदार असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. प्रशासनामार्फत वेगवेगळ्या समित्या चौकशी करिता नेमल्या जातात पण त्यात राजकीय व प्रशासकीय हस्तक्षेप असल्यामुळे त्यांच्या कडून निपक्षपणे संबंधित घटनेच्या मुद्देनिहा चौकशी केली जात नाही. स्वतः मुख्यमंत्री फलटलांना जाऊन भाजपच्या राजकीय नेत्यांना चौकशी न करता अभय देतात. डॉ संपदा मुंडे ह्या गरीब शेतकरी कुटुंबातल्या असून मौजे कवडगाव तालुका वडवणी जिल्हा बीड येथील रोजंदारी करणारे कुटुंब आहे. त्या कुटुंबावर खूप मोठ्या प्रमाणात संकट कोसळले असून यामध्ये जबाबदारी राजकीय नेते व प्रशासकीय यंत्रणेमार्फत दबावापोटी हॉटेल मधुदिप आत्महत्या केली नसून हत्या करण्यात आली आहे. या हातेश जबाबदार भाजपचे माजी खा. रणजीत सिंह नाईक निंबाळकर त्यांचे दोन पी ए, पीएसआय गोपाळ बदने घरमालक बनकर तसेच हॉटेलमध्ये संचालक दिलीप सिंह भोसले व त्यांचे कर्मचारी यांची संपूर्ण मुद्देनिहाय चौकशी करण्यात यावी व त्यांचे मोबाईल जप्त करून कॉल रेकॉर्डिंग तपासावेत अशी मागणी काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी शासनाकडे निवेदनाद्वारे केली. दवाखान्यात सेवेसाठी रात्री बेरात्री शवच्छेदानासाठी डॉक्टर मुंडे ला बोलावून घेऊन महिला असूनही त्रास दिला जात होता. भाऊबीजच्या दिवशी दिवाळी असतानाही २३ सप्टेंबर २०२६ ला तळहातावर सुसाईड नोट

▶ उर्वरित पान २ वर

## कैलास ठोंबरे यांच्या वाढदिवस निमित्त रुग्णांना बैठक व्यवस्था

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

माजलगाव पंचायत समितीचे माजी सदस्य सामाजिक कार्यकर्ते कैलास ठोंबरे यांच्या वाढदिवसानिमित्त दिंद्रुड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांना बसण्यासाठी आसन व्यवस्था करण्यात आली.

सामाजिक कार्यकर्ते कैलास ठोंबरे यांनी गेल्या काही महिन्यांपासून दिंद्रुड मध्ये स्वखर्चाने विकास कामांचा धूम धडाका लावला आहे, ३१ ऑक्टोंबर रोजी कैलास ठोंबरे यांच्या वाढदिवसानिमित्त मित्र परिवाराने स्वखर्चातून येथे नवीनच सुरू झालेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या



प्रांगणात रुग्णांना बसण्यासाठी आसन व्यवस्था केली. वाढदिवसानिमित्त आवाजावी खर्च करण्यापेक्षा सामाजिक हिताचे कार्य करणे या मागचा हेतू होता. त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्र व रुग्णांनी समाधान व्यक्त केले आहे. ग्रामपंचायत सदस्य अतुल चव्हाण, पत्रकार अमोल ठोंबरे, संतोष स्वामी,नागेश वकरे,गणेश काटकर,बाबासाहेब देशमाने,नागेश कानडे, किशोर ठोंबरे, राजेश स्वामी यांची यावेळी उपस्थिती होती.

# अखिल भारतीय ग्राहक पंचायत शाखा परळी वैजनाथ २०२५ ची नवीन कार्यकारिणी जाहीर

**तालुका अध्यक्षा चित्राताई देशपांडे तर तालुका महिला प्रमुख विजयाताई दहिवाळ यांची निवड सर्वानुमते झाली**

**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय ग्राहक पंचायत शाखा परळी वैजनाथ ची आज दिनांक २९ ऑगस्ट रोजी नवीन कार्यकारणी जाहीर करण्यात आली. अखिल भारतीय ग्राहक पंचायत चे देवगिरी प्रांताचे अध्यक्ष आदरणीय डॉक्टर विलास मोरे यांच्या अध्यक्षते खाली व यांच्या विचाराने कार्यकारनी जाहीर करण्यात आली. अखिल



भारतीय ग्राहक पंचायत परळी शाखा अध्यक्षा - चित्रा देशपांडे, तालुका महिला प्रमुख - विजयाताई दहिवाळ, तालुका उपाध्यक्ष - श्री रामेश्वर महाराज कोकाटे, सह उपाध्यक्ष - विद्या खिस्ते , तालुका सचिव - गोपाळ आंधळे, सहसचिव - १)संध्या सरोदे, सहसचिव - २)प्रीती टाक, कोषाध्यक्ष - तारावती अग्रवाल, तालुका प्रचार प्रसिद्धीप्रमुख - श्री पद्माकर उखळीकर, तालुका पर्यावरण प्रमुख - श्री चेतन सोदळे, तालुका लीगल सेल प्रमुख - अडवोकेट अशोक शहाणे,

वरील सर्वांची निवड सर्वांनुमते करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदरणीय डॉक्टर विलास मोरे तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री अण्णा कोपुलवार हे होते. तसेच परळी शाखेच्या अध्यक्षा चित्रा देशपांडे व परळी शाखेच्या महिला प्रमुख विजयाताई दहिवाळ या मंचावर होत्या. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन करून व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. ▶ उर्वरित पान २ वर